**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. २३६/२०१५ – निशाणी ७९ लगत आदेश</u>**

सोपान नाना माने इ. वि. नाना कृष्णा माने इ.

CNR No. MHSO2000-1009-2015

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ यांनी त्यांना कैफियत देणेस झालेला विलंब माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र.२अ च्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२अ ही अशिक्षीत, अडाणी असून तीला कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे यातील प्रतिवादी क्र.२अ ही मे. कोर्टास वकीलपत्र देवून हजर झालेली नाही. त्यामुळे मे. कोर्टानी प्रतिवादी क्र.२अ विरुध्द दि.०३/०७/२०२५ रोजी एकतर्फा आदेशासाठी प्रकरण ठेवले. प्रतिवादी क्र.२अ हिला सदरची कैफियत देणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात यावा. सदरचा विलंब हा योग्य व न्याय कारणासाठी झालेला असुन सदरचा विलंब जाणुनबूजून केलेला नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जावर वादी तर्फे म्हणणे मांडले की, सदर विलंब माफीचे अर्जात किती दिवसांचा विलंब झाला हे नमुद नाही. मोघमस्वरूपी खोटे कारण नमुद केलेले अर्ज कायद्याने चालणारा नाही. अर्जात नमूद केलेला मजकूर खोटा आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. वादी तर्फे सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेचा व निरंतरचे ताकीदीचा दाखल केला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र.२अ यांनी मुदतीमध्ये कैफियत दिले नाही ही बाब स्पष्ट आहे, परंतु सदरचा अर्ज मंजूर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. सदर प्रतिवादी क्र.२अ यांनी केलेल्या विलंबाचा विचार

करता त्यांचेवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे योग्य होईल. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.२अ यांचा अर्ज (नि.क्र.७९) त्यांनी वादी यांना रक्कम रु.३००/- देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना कैफियत/म्हणणे देण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.28 17:06:10 +0530

दिनांक – २८/०४/२०२६

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

<u>नियमित दिवाणी मुकदमा नं. २३६/२०१५ – निशाणी ८१ लगत आदेश</u>

सोपान नाना माने इ. वि. नाना कृष्णा माने इ.

CNR No. MHSO2000-1009-2015

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला "विना कैफियत" आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र.२अ च्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.२अ ही अशिक्षीत, अडाणी असून तीला कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे यातील प्रतिवादी क्र.२अ ही मे. कोर्टास वकीलपत्र देवून हजर झालेली नाही. त्यामुळे मे. कोर्टानी प्रतिवादी क्र.२अ विरुध्द दि.०३/०७/२०२५ रोजी एकतर्फा आदेशासाठी प्रकरण ठेवले. त्यानंतर प्रतिवादी यांनी विलंब माफी अर्जासह कैफियत दि.१८/०८/२०२५ रोजी दिलेली आहे. परंतु प्रस्तुत प्रतिवादी यांचे विरुध्द मे. कोर्टाने "विना कैफियत" आदेश पारित केलेला आहे. सदरचा दावा स्थावर मिळकतीसंबंधीचा असलेमुळे दाव्याचा गुणावगुणावर निकाल देणेसाठी केलेला "विना कैफियत" आदेश रद्द होवुन प्रतिवादीची कैफियत स्वीकारणे न्यायाचेकामी आवश्यक व गरजेचे आहे. सदरचा आदेश रद्द केलेस वादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट सदर आदेश रद्द न केलेस प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जावर वादी तर्फे म्हणणे मांडले की, अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा आहे. खोटी कारणे नमुद करुन खोटा अर्ज दाखल केलेला असलेमुळे अर्ज नामंजूर करणेत यावा. प्रतिवादीला समन्स बजावलेनंतर कैफियत देणेकरीता संधी देवुन देखील प्रतिवादी यांनी वेळेत हजर होवून कैफियत दिलेली नसल्यामुळे योग्य तो कायदेशीर आदेश मे. कोर्टानी केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अवलोकन केले असता

असे स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र.२अ यांनी मुदतीत दाव्याचे कामी हजर न झालेमुळे त्यांचे विरुध्द "विना कैफियत" आदेश झालेला आहे. वादी, प्रतिवादीचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.२अ यांनी मुदतीमध्ये दाव्याचे कामी मुदतीत हजर होवुन कैफियत दिलेली नाही ही बाब स्पष्ट आहे, परंतु सदरचा अर्ज मंजूर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्याने वादी यांचा कसल्याही प्रकारे नुकसान होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.२अ यांचा अर्ज ( नि.८१) मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.२अ यांचे विरुध्द झालेला "विना कैफियत" आदेश रद्द करुन त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.04.28 17:06:19 +0530

दिनांक – २८/०४/२०२६

( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Smt. P. R. Kulkarni,<br>Civil Judge, J. D. & J. M.<br>F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P. O. on | : | 28-04-2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 28-04-2026 |